पुण्यनगरी दि. 17/07/2022

# ५० हजारांचा गुटखा जप्त



**मांडवी / प्रतिनिधी**

अदिलाबाद ते दिग्रस महामंडळाच्या बसमध्ये अवैध गुटखा येत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यावरून मांडवी पोलिसांनी सरस विद्यालयाजवळ रोडवर बस थांबवून तपासणी केली. त्यात ४८ हजार ७२० रूपयांचा गुटखा जप्त करून मांडवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि.१५ जुलै रोजी ही कार्यवाही करण्यात आली.

अदिलाबाद ते दिग्रस जाणाऱ्या एम. एच.४०-८७९४ क्रमांकाच्या परिवहन महामंडळाच्या बसमधून अवैध गुटखा येत असल्याची गुप्त बातमी मिळताच पोलीस उपनिरीक्षक शिवप्रसाद कऱ्हाळे, जमादार कदम, शाम चव्हाण, चुनोडे यांनी बस थांबवून बसची तपासणी केली.

या बसमध्ये विमल पान मसाला, बाबा नवरत्न पान मसाला, तंबाखू असा एकूण ४८ हजार ७२० रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. आरोपी अक्रम नुरीवाला (रा.दिग्रस) व अक्रम भाटीवाला (रा.अदिलाबाद) यांना ताब्यात घेतले असून इतरांचा शोध घेण्यात येत आहे. सहायक पोलीस निरीक्षक शिवरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कऱ्हाळे अधिक तपास करीत आहेत.